# लो. टिळक संस्था, क्विकहिल फाऊंडेशनमध्ये करार

तभा वृत्तसेवा
नागपूर, १३ जानेवारी

लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था आणि क्विकहिल फाऊंडेशन यांच्यामध्ये सायबर क्राईम विषयासंबंधी शाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यासाठी नुकताच करार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून सी.एस. आर, अजय शिर्के, सुगंधा दाणी, संचालक अभिजीत देशमुख, प्राचार्य डॉ. महेंद्र सिंग, प्राचार्य डॉ. विवेक नानोटी, प्राचार्य डॉ. रवींद्र क्षीरसागर, प्राचार्य डॉ. नितीन चौधरी, डॉ. अभय शेंडे व प्रो. उघडे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानुसार सायबर क्राईम आणि सायबर क्रिमिनल विषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी 'सायबर अवेर्नेस लिटरेसी सेल' स्थापन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन ऋचा सिंग व प्रो. जोगी जॉन केले. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

